महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/ D17771

"उद्योग सारथी",
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : 21/10/15

परिपत्रक

विषय :- विकास कालावधीच्या विशेष सवलत योजनेस वाढीव मुदत देणेबाबत..

संदर्भ : १. परिपत्रक क्र.मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/ए७१२२२ दिनांक ०६.०३.२०१३.
२. परिपत्रक क्र.मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/बी२५७८५ दिनांक २९.०४.२०१४.

महामंडळाच्या वरील संदर्भिय परिपत्रक क्र. १ नुसार भुखंडाचा विकास करण्याच्या दृष्टीने भुखंडधारकाने केलेली परिणामकारक कार्यवाही विचारात घेऊन मुदतवाढ मंजूर करण्याचे सुधारीत धोरण निर्गमित करण्यात येऊन अशा अविकसित भूखंडाच्या विकासासाठी शेवटची संधी म्हणून दिनांक ३१.०८.२०१३ पर्यंत **विशेष मुदतवाढ योजना** लागू करण्यात आली. सदरचे धोरण हे दि. ३१.०८.२०१५ पर्यंत लागू असून या धोरणाचा फायदा घेऊनही ज्या भूखंडांवर बांधकाम सुरु आहे किंवा बांधकाम पूर्ण केले आहे परंतु मुदतवाढीचा कालावधी संपुष्टात आला आहे, अशा सर्व भूखंडांकरीता शेवटची संधी तसेच उद्योग वाढीकरीता प्रोत्साहन म्हणून विशेष मुदतवाढ योजनेच्या कालावधीत वाढ करण्याबाबतचा विषय दि. २२.०६.२०१५ रोजीच्या मा. संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदरहू विषयावर सविस्तर चर्चा होऊन ठराव क्रमांक ५४९८ पारीत करण्यात आला.

सदरहू ठरावाचे अनुषंगाने, महामंडळाच्या दि. ०६.०३.२०१३ च्या परिपत्रकामधील धोरणाचा फायदा घेऊनही ज्या भूखंडांवर बांधकाम सुरु आहे किंवा बांधकाम पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करणेकरीता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावयाची आहे, अशा सर्व भूखंडांकरीता शेवटची संधी म्हणून विशेष मुदतवाढ योजनेचा कालावधी वाढवून मुदतवाढ देणेबाबत खालीलप्रमाणे धोरण निर्गमित करण्यात येत आहे-

१. ज्या भूखंडधारकांनी दि. ०६.०३.२०१३ चे परिपत्रकामधील धोरणानुसार दुसरी मुदतवाढ अनुक्रमे १० टक्के (ड व ड+ प्रभागाकरीता)/४० टक्के (अ, ब व क प्रभागाकरीता) ना परतीची अतिरिक्त रक्कम भरुन मुदतवाढ घेतली आहे तथापि, काही कारणास्तव इमारत बांधकाम पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करता आला नाही. केवळ अशाच भूखंडधारकांना पुढील एक वर्षासाठी तीसरी मुदतवाढ प्रचलित दराच्या ५ टक्के प्रमाणे ना परतीची अतिरिक्त रक्कम आकारुन देण्यात यावी.

२. उपरोक्त (१) मधील नमूद धोरणाचा ज्या भूखंडधारकांनी लाभ घेतला आहे, त्यांनी दि. ३१.०८.२०१६ पर्यंतच्या कालावधीमध्ये इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन उत्पादनात जाणे बंधनकारक राहील.

३. दि. ०१.०९.२०१५ ते ३१.०८.२०१६ या कालावधीच्या मुदतवाढीकरीता प्रचलित दराच्या ५ टक्के रक्कम भरणा करुन इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन उद्योग सुरु करण्यात येईल, 'अन्यथा भूखंड ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत आपोआप महामंडळाकडे वर्ग होईल, अशा आशयाचे हमीपत्र (undertaking) भूखंडधारकाकडून घेण्यात यावे. तद्नंतरच या विशेष मुदतवाढ योजनेचा लाभ भूखंडधारकास देण्यात यावा.

४. ज्या भूखंडधारकांनी दि. ०१.०९.२०१३ ते ३१.०८.२०१४ या कालावधीची पहिली मुदतवाढ मंजूर करुन घेतली आहे, परंतु दि. ०१.०९.२०१४ ते ३१.०८.२०१५ या कालावधीच्या दुस-या मुदतवाढीकरीता संपर्क साधलेला नाही अथवा दि. ०१.०९.२०१४ ते ३१.०८.२०१५ या कालावधीच्या दुस-या मुदतवाढीस तत्वतः मंजूरी देण्यात आली, परंतु अतिरिक्त अधिमूल्याची रक्कम भरणा केलेली नाही. मात्र, आता दि. ३१.०८.२०१५ नंतर मुदतवाढीचा प्रस्ताव दिला आहे अशा भूखंडधारकांकडून दि. ३१.०८.२०१४ नंतरच्या दुस-या मुदतवाढीकरीता अनुक्रमे १० टक्के (ड व ड+ प्रभागाकरीता)/४० टक्के (अ, ब व क प्रभागाकरीता) याप्रमाणे अतिरिक्त अधिमूल्याची रक्कम वसुल करावी. त्याचबरोबर उपरोक्त नमूद (१) प्रमाणे दि. ०१.०९.२०१५ ते ३१.०८.२०१६ या एक वर्षाच्या मुदतवाढीसाठी प्रचलित दराच्या ५ टक्के प्रमाणे अतिरिक्त अधिमूल्याची रक्कम स्वतंत्रपणे वसुल करण्यात यावी.

५. ज्या भूखंडधारकांनी अद्यापही मुदतवाढीकरीता प्रस्ताव दिलेला नाही किंवा भूखंड विकासासाठी कोणतीही परिणामकारक कार्यवाही केलेली नसून भूखंड अद्यापही मोकळा आहे असे भूखंड महामंडळाच्या ताब्यात घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

६. दि. ३१.०८.२०१६ नंतर कोणतीही मुदतवाढ मंजूर करण्यात येणार नाही.

सदर विशेष मुदतवाढ योजनेअंतर्गत मुदतवाढ मंजूर करण्याचे अधिकार प्रादेशिक अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहेत.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(ए.एल.जऱ्हाड)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.

९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई.